93

# महाराष्ट्र शासन
# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर
# दरपत्रक सुचना सन 2023-24

कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सोलापूर जिल्हयातील मागासवर्गीय वस्तीतील निकामी हातपंपाचे कट्टे पुर्नबांधणी करणे बाबतच्या कामासाठी अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणारे ठेकेदारांकडुन दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागवित आहेत. दरपत्रकचा कोरा नमुना http: **www.zpsolapur.gov.in** संकेत स्थळावर दिनांक :- 07 /09/2023 पासुन दिनांक :- 15/09/2023 रोजी सायंकाळी 17.00 वाजे पर्यंत उपलब्ध राहील.

परिपुर्णरित्या भरलेल्या दरपत्रक दिनांक :-15/09/2023 सायंकाळी 17.00 वाजे पर्यंत/त्यापुर्वी स्विकारण्यात येतील. निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक :- 18/09 /2023 रोजी उघडण्यात येईल. तसेच निविदा आर्थिक लिफाफा (दरपत्रक) दिनांक :- 18/09 /2023 रोजी सायंकाळी 17.00 वाजता उघडण्यात येणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | काम पुर्ण करणेची मुदत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | जिल्हयातील विविध गावातील मागासवर्गीय वस्तीतील निकामी हातपंपाचे कट्टे पुर्नबांधणी करणे व जुणे हातपंप संच बदलणे (कामांची संख्या 52 नग) | 7,78,972/- | 7,800/- | 3 महिने | अशा कामाचा अनुभव असणारे ठेकेदार, |

1. उपरोक्त सर्व कामा बाबत निविदा, अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील दरपत्रक नोटीसच्या संचा मध्ये नमुद केलेला असून कोऱ्या दरपत्रक संच उप अभियंता (यां) यांचे कार्यालयात मिळतील.
2. दरपत्रक च्या अटी शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त दरपत्रका पैकी, एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही करण न देता नाकारणेचा हक्क निम्म स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

उप अभियंता (यांत्रिकी)
यांत्रिकी उपविभाग
जिल्हा परिषद सोलापूर

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद सोलापूर

# सविस्तर दरपत्रक सुचना
## 2022-23

1. सदर संपुर्ण दरपत्रक नोटीस http: www.zpsolapur.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहेत.
2. सदर कामाचे दरपत्रक नोटीस कोरी प्रत उप अभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद सोलापूर यांचे कार्यालयात उपलब्ध होईल.
3. मक्तेदारांनी दरपत्रके खालील प्रमाणे दोन लिफाफा (Two Envelope) मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) तांत्रिक लिफाफा**

1. बयाना रक्कमेचा धनाकर्ष / धनादेश
2. उद्योग आधार प्रमाणपत्र
3. पॅन कार्डची प्रत.
4. जी.एस.टी. प्रमाणपत्राची प्रत.
5. हातपंपाचे कट्टे बांधणी अनुभव प्रमाणपत्रे
6. रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर माझे फर्म महाराष्ट्र राज्यात कोणत्याही जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत व शासकीय कामात काळयायादीत नाही. तसेच मी सादर केलेले सर्व कागदपत्रे बरोबर आहेत. असे स्वयम घोषणापत्र करुन सादर करणे.

**(ब) अर्थिक लिफाफा**

मक्तेदारांनी आपले दर आपल्या फर्मच्या लेटर पॅडवर स्वच्छ अक्षरात नमुद करुन स्वतंत्र लिफाफा बंद करुन देणे.

**दरपत्राकाच्या इतर अटी व शर्ती :**

1. दरपत्रकाच्या किंमतीत अंदाजपत्रकानुसार साहित्य सर्व करांसहित पुरवठा करणे, उभारणी करणे, वाहतुक, पॅकींग व साहित्य गाडीत भरणे उत्तरविणे, कार्यान्वित करणे इत्यादी समावेश असेल.
2. निविदेतील सर्व साहित्य दरपत्रकातील तांत्रिक निकषानुसार पुरवठा करावयाचे आहे. निविदेतील तांत्रिक निकषानुसार साहित्य नसल्यास ते स्विकारले जाणार नाही. सदरचे आधिकार उप अभियंता (यांत्रिकी) यांना असतील. सदर साहित्य नाकारले गेल्यास त्यांची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.
3. आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करण्यास तांत्रिक अडचणी असल्यास त्याबाबत दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे बाबत अंतिम निर्णय मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांचा राहिल.
4. दरपत्रके / दरमंजूरी झाल्याचे कळविले नंतर निविदा प्रक्रियेतील कमीत कमी मंजूर दरानुसार कामे करण्यास / पुरवठा करण्यास तयार असल्याचे संमतीपत्र, रुपये 500/- किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर साहित्य पुरवठा तथा अनुषंगीक कामे करण्यास तयार असल्याबाबत जिल्हास्तरावर करारनामा करुन 7 दिवसाच्या आत दयावा लागेल.

5. 3 टक्के सुरक्षा अनामत रक्कम देयका मधुन वजावट करण्यात येईल व ती सहा महिन्या नंतर परत करण्यात येईल.
6. सदर काम करताना कोणतीही हानी झाल्यास / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
7. अंदाजपत्रकातील साहित्याची तांत्रिक तपासणी उपअभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कार्यालयाकडून करुन घेतल्या शिवाय योजनेच्या स्थळी साहित्य आस्थापित करण्यात येऊ नये.
8. अ) पुरवठा आदेश मिळाले पासुन 3 महिन्याचे आत काम पुर्ण करणे आवश्यक आहे.
   ब) जर कंत्राटदाराने विहित मुदतीत आदेशित काम पुर्ण केले नाही तर किंवा विलंबाचा संयुक्तीक खुलासा न केल्यास जिल्हा परिषद सोलापूर कडील नियमानुसार दंडाची रक्कम आकारली जाईल.
   क) तर्कसंगत / वास्तववादी कारण असल्यास / स्थानिक अडचणी असल्यास कामाच्या कालावधीस मुदत वाढ देता येईल. मात्र कंत्राटदार काम करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा कंत्राटदाराने आदेशित केलेल्या कामा पैकी काही साहित्य अस्विकृत झाले असल्यास असे अस्विकृत साहित्य मुदतीत बदलून दिले नाही तर काम देणार यंत्रणा त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही पुरवठादारा कडुन मंजूर दराने उर्वरित साहित्य खरेदी करण्यास सक्षम राहतील व कसूरदार पुरवठादार / कंत्राटदारांची जिल्हा स्तरावरील सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
9. देयकातुन सुरक्षा रक्कम, आयकर, जी.एस.टी. जिपसेस व इतर सर्व करांची शासकीय नियमानुसार वजावट करुन देयक अदा करण्यात येईल.
10. मक्तेदारांनी कामाचे नकाशे, निविदेतील अटी व शर्तीनुसार मापदंडा प्रमाणे कामाचे स्थळ मंजुर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबीचा अभ्यास करुन दरपत्रके सादर करावेत.
11. सदर काम केले नंतर निघालेले जुणे साहित्य ज्या त्या तालुक्यास जमा करावे व त्याची पोहच देयकासोबत सादर करावे.
12. मक्तेदारांनी सादर केलेली निविदा व निविदेतील दर, लिफाफा क्रं. 2 उघउले नंतर 90 दिवसा पर्यंत वैध राहतील.
13. निविदे बाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना, शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती http:www.zpsolapur.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
14. निविदेतील सर्व वा कोणतीही अटी वा शर्ती पुर्ण न करणाऱ्या मक्तेदाराच्या निविदा व अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.
15. कोणत्याही अटीवर (Conditional) आधारित दरपत्रके स्विकारल्या जाणार नाहीत अथवा स्विकारल्या तरी मंजूर केल्या जाणार नाहीत.
16. निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
17. संक्षिप्त निविदा सुचना व सविस्तर सुचना निविदा तंत्राचा एक भाग राहील.
18. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग**
**जिल्हा परिषद सोलापूर**

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद सोलापूर**